# शिक्षण विभाग (प्राथमिक)
# जिल्हा परिषद पालघर

Email-edu-Palghar@gmail.com

**जा.क्र.पाजिप/शिक्षण/प्राथ/वशी - ६८९** **दिनांक-१२/०७/२०२३**

**प्रति,**

**गट शिक्षणाधिकारी,**
**पंचायत समिती, (सर्व)....................,**

विषय - जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सेवा निवृत्त शिक्षकांची कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करणेबाबत.
(स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांतील व खाजगी शिक्षण संस्थांच्या अनुदानित शाळातील सेवा निवृत्त शिक्षक)

संदर्भ - मा. उप सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. सकीर्ण-२०२३/प्र.क्र.३६२/ टिएनटि-१ दिनांक ०७/०७/२०२३.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, राज्यातील सर्व शाळा हया जून महिन्यात सुरु झालेल्या असुन जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांची पदे मोठया प्रमाणात रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तसेच, नियोजित शिक्षक भरती संदर्भात मा. उच्च न्यायालयात दाखल रिट याचिकांमुळे भरती प्रक्रियेस विलंब होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. सदरची सर्व परिस्थिती विचारात घेऊन पवित्र प्रणालीमार्फत नियमित शिक्षक भरतीमधून शिक्षक उपलब्ध होईपर्यंत, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांतील व खाजगी शिक्षण संस्थांच्या अनुदानित शाळांतील सेवा निवृत्त शिक्षकांमधुन कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात जिल्हा परिषद शाळांतील रिक्त शिक्षकीय पदे संदर्भिय पत्रात दिलेल्या तरतुदीप्रमाणे भरण्याबाबत निर्देशित केले आहे.

सदर नियुक्त्या हया १५ दिवसाच्या कालावधीत करावयाची असल्याने आपल्या गटातील सेवानिवृत्त शिक्षकांची माहिती सोबत जोडली आहे, त्यांना दयावयाचा पत्राचा नमुना सुध्दा सोबत देण्यात येत आहे. संबंधीत सर्व सेवानिवृत्त शिक्षकांना संपर्क करावा व ज्यांचे वय ७० वर्षा पेक्षा कमी आहे व जे करारनाम्यानुसार काम करण्यास तयार आहेत अशा सेवानिवृत्त शिक्षकांचे अर्ज (सोबत नमुना) दिनांक १८/०७/२०२३ पर्यंत सादर करावेत. या बाबत दिरंगाई होणार नाही याची दक्षता घ्यावी. अन्यथा आपणा विरुध्द कारवाई करण्यात येईल.

**सोबत** - सह पत्र,

**प्रपत्र**

| अ.क्र. | सेवा निवृत्त शिक्षकाचे नांव | सेवा निवृत्ती दिनांक | इच्छूक असल्याबाबत अर्ज (होय/नाही) |
|---|---|---|---|
| | | | |

**भानुदास पालवे, (भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,पालघर**

# शिक्षण विभाग (प्राथमिक)
# जिल्हा परिषद पालघर

Email-edu-Palghar@gmail.com

---

**जा.क्र.पाजिप/शिक्षण/प्राथ/ /वशी - ६९०** **दिनांक-१२/०७/२०२३**

**प्रति,**

..........................

..........................

..........................

विषय - जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सेवा निवृत्त शिक्षकांची कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करणेबाबत.
(स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांतील व खाजगी शिक्षण संस्थांच्या अनुदानित शाळातील सेवा निवृत्त शिक्षक)

संदर्भ - मा. उप सचिव, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. सकीर्ण-२०२३/प्र.क्र.३६२/ टिएनटि-१ दिनांक ०७/०७/२०२३.

संदर्भिय शासन पत्रानुसार पालघर जिल्हयातील शिक्षकांच्या रिक्त जागेवर काम करण्यास आपण इच्छूक असाल तर आपला कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात शिक्षक पदासाठीचा अर्ज संबंधित गट शिक्षणाधिकारी यांचेकडे तात्काळ सादर करावा.

आपले वय ७० वर्षापेक्षा जास्त असु नये तसेच करारनामा (बंधपत्र) करणे बंधनकारक राहील.

**भानुदास पालवे, (भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,पालघर**

**दिनांक-    /०७/२०२३**

**प्रति,**

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद, पालघर**

विषय - जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सेवा निवृत्त शिक्षकांची कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करणेबाबत.

संदर्भ – आपल्या कार्यालयाकडील पत्र क्र.पाजिप/शिक्षण/प्राथ/वशी/ ६९० दिनांक १२/०७/२०२३.

संदर्भिय पत्रानुसार मी पालघर जिल्हा परिषदेतील शिक्षकांच्या रिक्त जागावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर काम करण्यास तयार आहे. माझी जन्मतारीख .............................. असुन मी दिनांक.......................... रोजी सेवा निवृत्त झालेलो आहे व सध्या पालघर जिल्हयात वास्तव्यास आहे.

सदर पदासाठीचा आवश्यक करारनामा (बंधपत्र) करुन देण्यास मी तयार आहे. तरी कृपया माझ्या अर्जाचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन मला कंत्राटी तत्वावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक देण्याबाबत विनंती आहे.

**आपली/आपला विश्वासु**

(.................................................)